
# आंबेडकर भवन

## चला सत्य जाणुन घेऊया



**दि पीपल्स इम्प्रव्हमेंट ट्रस्ट**

**संस्थापक : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

Scanned by CamScanner

अनुयायी आहेत. समाजाच्या भल्यासाठी आपले सर्वस्व झोकून देण्याची तयारी असलेले लोक आहेत. मागील अनेक वर्षांपासून ते आपापल्या क्षेत्रात आपल्या कुवतीनुसार आणि समजुतीनुसार समाज बांधवांची निस्वार्थपणे सेवा करीत आहेत. म्हणूनच अनंत अडचणींचा, दडपशाहीचा, धाकदपटशांचा सामना करीत बाबासाहेबांचे सोशल सेंटरचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ते धडपडत आहेत. या सर्व बाबी लोकांना कळाव्यात, मागील काही काळात ट्रस्टच्या संबंधात जे खोटेनाटे पसरविण्यात आले आहे व खुद्द प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दस्तऐवजाबद्दल खोटी व अर्धवट माहिती पसरविण्यात आली त्याचे निराकरण व्हावे यासाठी ही माहितीपर पुस्तिका ट्रस्टच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येत आहे. या पुस्तिकेमुळे पिपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट व आंबेडकर भवन याबाबत पसरविण्यात आलेले अनेक गैरसमज दूर होतील अशी अपेक्षा आहे. पिपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्टने कोणतेही बेकायदेशीर काम आतापर्यंत केलेले नाही पुढेही करणार नाही. बाबासाहेबानी ट्रस्टची निर्मिती त्यांनी निर्माण केलेल्या सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेण्यासाठी, संरक्षण करण्यासाठी व तिचा विकास करण्यासाठी केली आहे. या गोष्टीचे ट्रस्टच्या सदस्यांना भान आहे. यामुळेच ट्रस्टने आतापर्यंतचे प्रत्येक कार्य पारदर्शीपणे, जनतेला पूर्ण माहिती देऊनच केले आहे. या पुस्तिकेतून जनतेला ट्रस्टच्या संदर्भातील प्रत्येक बाबींची सत्य माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पुस्तिकेच्या निर्मितीसाठी ज्यांचे ज्यांचे योगदान लाभले आहे त्या सर्वांचे मी आभार मानतो.आणि आंबेडकरी जनतेला ही पुस्तिका अर्पण करतो.

**ॲड. श्रीकांत गवारे**<br>
**सचिव, पिपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट, मुंबई**

Scanned by CamScanner

# आंबेडकर भवन - चला सत्य जाणून घेऊ या !!

मुंबईतील दादर पूर्व विभागात एक तळमजला या स्वरूपात उभे असलेले आंबेडकर भवन पाडल्याचा प्रश्न हा सद्यस्थितीत महाराष्ट्रातील समस्त आंबेडकरी जनतेचे जीवन- मरण, अस्मिता,चळवळीचे अस्तित्व इत्यादी जे काही असेल त्या सर्वांचा ज्वलंत प्रश्न बनला आहे. यापूर्वी आंबेडकरी जनता राजकीय मतभेद, सामाजिक कार्याविषयीचे मतभेद, प्रांतिक वेगळेपण, अशा अनेक मुद्यावर गट-तटात विभागलेली होती. मात्र आंबेडकर भवन पाडल्याच्या मुद्यावरून आंबेडकर कुटुंबाच्या रक्ताचे वंशज असलेल्या नेत्यांचे श्रेष्ठत्व मान्य करून त्यांच्याकडे आंबेडकरी राजकीय चळवळ, बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक संस्था सोपविण्यात याव्यात असे मानणारा गट तुम्हाला आंबेडकर कुटुंबियांचे वावडे का? असा प्रश्न उपस्थित करीत आहे. तर दुसरीकडे आम्हीही बाबासाहेबांच्या तत्वज्ञानाचे व विचारांचे वारस आहोत, आम्हीही बाबासाहेबांचे कार्य पुढे नेऊ इच्छितो, बाबासाहेबांचे स्वप्न आमच्या कुवतीप्रमाणे पूर्ण करू इच्छितो; त्यास आंबेडकर कुटुंबियांनी आडकाठी आणू नये, असे म्हणणारे गट पुढे आले आहेत. अशाप्रकारे आंबेडकर भवन पाडल्याच्या मुद्द्यावरून आंबेडकरी जनता पहिल्यांदाच रक्ताच्या वारसाचे समर्थक व विचारांच्या वारसाचे समर्थक अशा दोन गटांमध्ये विभागली गेली आहे. एकापरीने हजरत मोहम्मद पैगंबरांनंतर प्रेषितांच्या विश्वासू शिष्यांना त्यांचा उत्तराधिकारी मानावे की प्रेषितांच्या रक्ताच्या नातेवाईकांना उत्तराधिकारी मानावे; यावरून जसे शिया आणि सुन्नी असे दोन गट निर्माण झाले.तशीच काहीशी अवस्था आंबेडकरी चळवळीमध्ये उदभवली आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. ही स्थिती निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे आंबेडकर भवनच्या जागेच्या मालकीबाबंत जनतेला सत्यस्थिती माहिती नसणे हे आहे. यामुळे खोट्या अफवांचे प्रचंड पीक आले आहे. सत्य जाणून न घेताच लोक भावनेच्या आधारे आपले मत बनवित आहेत. यामुळे ही जागा विकत घेऊन तेथे समाजाच्या मालकीचे, हक्काचे सभागृह बनवावे, अन्याय अत्याचाराने पीडित झालेल्या लोकांना आधार देण्यासाठी या भवनाचा उपयोग व्हावा, हे भवन म्हणजे आंबेडकरी जनतेच्या दु:खावर उतारा शोधण्याचे संशोधन केंद्र बनावे, शिक्षणासाठी धडपडणाऱ्या हुशार मुलांच्या ज्ञानार्जनासाठीचा निवारा बनावे, बाहेरगावाहून येणाऱ्या कार्यकर्त्यांचे आश्रयस्थान व्हावे, येथे समाजाला भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येचे संशोधन व्हावे, सरकारी धोरणाचा अभ्यास करून चुकीच्या धोरणाविषयी सरकारला जाब विचारणारे आणि समाजाच्या विकासासाठी आवश्यक धोरण बनवून देणारे हे केंद्रीय मुख्यालय बनावे, या बाबासाहेबांनी पाहिलेल्या भव्यदिव्य स्वप्नांच्या ठिकऱ्या उडाल्या आहेत. आमच्या बापाने समाजाला सक्षम करण्यासाठी ही जागा विकत घेतली. मात्र बाबासाहेबांच्या भव्यदिव्य स्वप्नांची जाणीव नसलेल्या लोकांनी याच जागेच्या मुद्यावरून समाजाची दिशाभूल करून बंधुभावाने वागणाऱ्या समाजबांधवाना एकमेकांचे वैरी म्हणून उभे केले आहे. बुद्ध म्हणतात ''न हि वेरे वेरानि सम्मन्तीध कुदाचनं। अवेरेन च सम्मन्ति एस धम्मो सनन्तनो।।" वैराने वैर कधीही शांत होत नाही. वैर प्रेमानेच शांत होते. हाच जगाचा शाश्वत नियम आहे. आपण सर्वांना खुद्द बाबासाहेबांनीच बुद्धाच्या चरणावर नेले आहे. म्हणूनच बुद्धाचाच मार्ग अनुसरून आपला वाद वैराने नव्हे तर प्रेमाने सोडविला पाहिजे. जर प्रेमाने हा वाद सोडविला पाहिजे तर सर्वप्रथम आंबेडकर भवनाचे नेमके सत्य काय आहे हे समजून घेतले पाहिजे. सत्य समजून घेण्यासाठी सर्वप्रथम आपण आतापर्यंत मनात बाळगलेल्या धारणा, बाबासाहेबांवरील निर्व्याज प्रेमापोटी उचंबळून आलेल्या भावना, ऐकीव माहितीमुळे मनात निर्माण झालेला गोंधळ, राग, द्वेष हे सर्व बाजूला ठेऊन निर्विकार मनाने सत्याचा शोध घेऊ या! चला तर मग, आंबेडकर भवनचे नेमके सत्य आहे तरी काय हे शोधूनच बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करायचे की या स्वप्नाचा चक्काचूर होऊ द्यायचा हे ठरवू या!!!

## काय होते बाबासाहेबांचे स्वप्न ?

स्वप्न पाहणे, ते फुलविण्यासाठी धडपड करणे,स्वप्न पूर्ण झाले नाही; म्हणून उदास होणे आणि पुन्हा नव्या जोमाने या स्वप्नाचा पाठलाग करणे हा मानवी स्वभाव आहे. आपणा सर्वांचा बाप म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर असाच एक स्वप्न पाहणारा आणि ते प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा महामानव होता. या आमच्या मुक्तिदात्या बापाने आपल्या करोडो लेकरांसाठी एक स्वप्न पाहिले. ते स्वप्न होते, माझ्या समाजाच्या मालकीचे, हक्काचे, जेथे आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणाच्याही आडकाठीशिवाय निर्भयपणे जाता येईल, वहिवाट करता येईल असे सामाजिक केंद्र निर्माण करण्याचे! बाबासाहेबांचे हेच ते स्वप्न होते, अस्पृश्य लोकांच्या उन्नतीसाठीचे केंद्र म्हणून व समाजाच्या सामूहिक उत्पन्नाचे साधन म्हणून एक भव्य इमारत



Scanned by CamScanner

बांधण्याचे!! या स्वप्नाच्या पूर्तीचा त्यांनी किती ध्यास घेतला होता, हे १५ फेब्रुवारी १९४१ रोजी फलटण रोड, मुंबई येथे केलेल्या भाषणातून दिसते. ते म्हणतात,"ज्याप्रमाणे एखादा शेठ आपल्या मुलांसाठी इमारत किंवा एखादी चाळ बांधून ठेवतो. त्याप्रमाणे ही इमारत बांधण्याचा माझा हेतू आहे.माझ्यानंतर या इमारतीपासून तुम्हाला फारच मदत होईल. परंतु तुम्ही एकोप्याने राहिले पाहिजे." त्यांची समाजाप्रती असलेली ही कळकळ पाहिली तर, या जागेच्या कारणावरून आता जे रणकंदन माजविण्यात येत आहे. ते या महापुरुषाच्या स्वप्नाच्या चिंधड्या उडविणारे आहे असे म्हणावे लागेल. बाबासाहेब नुसते हे स्वप्न पाहूनच थांबले नाहीत. लगेच ते कामाला लागले. मुंबईतील त्यांचे विश्वासू सहकारी, गणपत महादेव जाधव उर्फ मडके बुवा, गोविंद तबा परमार उर्फ परमार गुरुजी, शांताराम अनाजी उपशाम उर्फ उपशाम गुरुजी, माझगावच्या ताडवाडीतील रामजी रावजी बोरीकर अशा अनेक सहकाऱ्यांसह त्यांनी मुंबईच्या चाळी-चाळींत फिरून इमारत फंडाच्या नावाने पै-पैसा, आणा-रुपया गोळा करण्यास सुरुवात केली. इमारत फंड गोळा करण्यासाठी घेतलेल्या पहिल्याच सभेत दिनांक १९ मार्च १९३८ रोजी माझगाव भागातील ताडवाडीत राहणाऱ्या अस्पृश्य बांधवानी त्यांना इमारत फंडासाठी १०१ रुपये दिले. यानंतर लगेच इमारत फंडाच्या खजिनदार पदाची जबाबदारी सेवाभावी वृत्तीने सांभाळणारे उपशाम गुरुजी यांनी बाबासाहेबांच्या आदेशानुसार १००० पावती पुस्तके छापली. याद्वारे वर्गणी जमा करण्यासाठी मुंबई व इतर शहरांत चाळ कमिट्या व ग्रामीण भागात तालुका कमिट्या, गाव कमिट्यांचे गट स्थापन करण्यात आले. पुरुषाने २ रुपये व स्त्रीने १ रुपया या दराने वर्गणी द्यावी असे ठरविण्यात आले. यानंतर इमारत फंड गोळा करण्यासाठी मुंबई शहर व परिसरात त्यांनी अनेक सभा घेतल्याचे दिसते. बाबासाहेबांनी ज्या जागेवर "आंबेडकर भवन" आहे, ती जागा सप्टेंबर १९४० मध्ये ताब्यात घेतल्याचे १ नोव्हेंबर १९४० रोजी या जागेवर घेतलेल्या सभेतील भाषणावरून दिसते. मात्र त्यावेळी या जागेच्या खरेदीपोटी द्यावयाची रक्कम देण्यात आली नव्हती. ही रक्कम बारा वर्षांत हप्त्या-हप्त्याने द्यावयाची होती. या रकमेचे व्याज दरसाल रुपये २,२०० प्रमाणे देण्याचे ठरले होते. या जाहीर सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्तुत जागेवर तीन मजल्याची भव्य इमारत बांधण्याचा संकल्प जाहीर केला. पहिल्या मजल्यावर अर्ध्या भागात भारतभूषण छापखाना व अर्ध्या भागात म्युनिसिपल युनियनची व इतर कार्यालये तसेच काही राहण्याच्या खोल्या ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल. दुसऱ्या माळ्यावर गेस्ट रुमसारखे उत्पन्नासाठी भाडेपट्टीवर देण्यास खोल्या तयार करण्यात येतील. तर तिसऱ्या माळ्यावर मोठा हॉल निर्माण करण्यात येईल. या योजनेतून भाड्यापोटी वर्षाला साधारणपणे ४,००० रुपये उत्पन्न मिळेल व त्यातून खर्च वजा जाता २,५०० रुपये शिल्लक राहतील, या रकमेतून खेड्यापाड्यातील अन्यायग्रस्त लोकांना मदत करता येईल असे बाबासाहेबांनी या सभेत सांगितले. यासंदर्भात जनता वृत्तपत्रात २५ डिसेंबर १९४० रोजी अस्पृश्य लोकांना उद्देशून प्रसिद्ध केलेल्या विनंती पत्रकात बाबासाहेब म्हणतात,"आपली चळवळ कायम चालावी म्हणून आपली स्वत:ची जागा, इमारत व शाश्वत निधी असणे क्रमप्राप्त झाले आहे. या इमारतीत आपल्या सर्व संस्था, व त्यांची ऑफिसे केंद्रीभूत होतील. भारत भूषण छापखाना, जनता, शिक्षण संस्था, तसेच म्युनिसिपल कामगार संघ, व स्वतंत्र मजूर पक्ष यांची ऑफिसे, सार्वजनिक वाचनालय, सभा व सामाजिक संमेलने आणि लग्नकार्यादी धार्मिक विधीकरीता एक विस्तीर्ण हॉल इत्यादींचा येथे समावेश होईल. या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी बाबासाहेब व त्यांचे सहकारी सातत्याने काम करीत होते. त्यांच्या परिश्रमामुळे दि.१९ मार्च १९३८ ते दि.३० ऑक्टोबर १९४४ पर्यंत एकूण ४५,०९५ रुपये, ६ आणे व ९ पैसे इतकी रक्कम इमारत फंडाच्या नावाने गोळा करण्यात आली. यातून दि.३० ऑक्टोबर १९४४ रोजी २,३३२ चौरस वार क्षेत्रफळाचा भूखंड ३६,५३५ रुपये किंमत देऊन अंबालाल पूनमचंद यांचेकडून विकत घेण्यात आला. दि.३० ऑक्टोबर १९४४ रोजी जागेचे खरेदी खत नोंदविण्यात आले. या खरेदीखतामध्ये खरेदीदार म्हणून १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर २) भाऊराव कृष्णराव गायकवाड ३) दौलत गुणाजी जाधव ४) गणपत महादेव जाधव ५) गोविंद तबा परमार ६) पांडुरंग नथुजी राजभोज यांची नावे आहेत. मुंबई इलाख्यातील महार लोकांकडून १,९३८रुपयांपासून गोळा करण्यात येणारा इमारत फंड, बाबासाहेबांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन संस्थानिक, राजे-रजवाडे व इतर धनिक लोक यांनी केलेली आर्थिक मदत यातून "द बॉम्बे शेड्युल्ड कास्ट्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट" च्या मालकीची जागा खरेदी करण्यात आल्याचे डॉ. बाबासाहेबांनी दि.१४ जुलै १९५२ रोजी मुंबई येथील दामोदर हॉल येथे घेतलेल्या जाहीर सभेत सांगितले आहे. या सभेत त्यांनी इमारत फंडाच्या नावाने एकूण १ लाख ११ हजार २२८ रुपये, ४ आणे ३ पैसे इतका निधी जमा झाला. यापैकी ३१ हजार ७०९ रुपये ४ आणे इतका निधी महार समाजाने जमा केला. उर्वरित ७५ हजार ५०० रुपयांचा निधी वरच्या वर्गातील मित्रांकडून जमा केला. या रकमेपैकी ३५ हजार ५३५ रुपये जागा खरेदीसाठी, ३५,००० रुपये प्रेसची इमारत बांधण्यासाठी

खर्च करण्यात आले. उर्वरित ३९ हजार ६९३ रुपये व ४ आणे ३ पैसे इंपिरियल बँकेत जमा आहेत, असा हिशोब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे.(BAWS , VOL 18 , Part III पृ.क्र.३१०- ३११). दि.२० जुलै १९५२ रोजी महार समाजसेवा संघाने आयोजित केलेल्या सत्काराच्या कार्यक्रमात मुंबई येथे समाजाच्या मालकीचा हॉल बांधण्याची आठवण करून देताना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''मी त्या दिवशी दामोदर हॉलमध्ये निवेदन केल्याप्रमाणे तुम्ही किती पैसे जमविले व मी किती पैसे जमविले हे स्पष्ट केले. माझ्या नावावर तुमचे किती पैसे बँकेत आहे, ते मी तुम्हाला स्पष्ट सांगून टाकले आहे. हेतू हा की, माझ्या पश्चात माझ्या मुलानेही त्यावर आपला हक्क सांगू नये." बाबासाहेबांनी ट्रस्टची जागा कशाप्रकारे विकत घेतली व प्रेसची इमारत कशाप्रकारे बांधली; याचा स्वतः दिलेला हा तपशील पाहिला तर, जागेच्या खरेदी संदर्भातील सर्व शंका दूर होतील. सदर जागा आणि प्रेसची इमारत आपल्या कुटुंबियांची खासगी मिळकत नसून ट्रस्टच्या मालकीची आहे व ट्रस्टच्या जागेत छापखाना असल्यामुळे या जागेच्या भाड्यापोटी आपण दरमहा ५० रुपये भाडे ट्रस्टला देतो, हे त्यांनी लघुवाद न्यायालयातील दावा क्रमांक १०९५/४९२० मध्ये विरोधी वकील देवधर यांनी घेतलेल्या उलट तपासणीत शपथेवर न्यायालयास सांगितले आहे. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास ट्रस्टची जागा,आता जेथे बुद्धभूषण प्रेस आहे. ती जागा लोकवर्गणीतून विकत घेण्यात आली व ती कायदेशीरपणे ट्रस्टच्या मालकीची आहे हे सिद्ध होईल.

## पीपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट काय करू इच्छिते ?

पददलित लोकांच्या स्वतःच्या मालकीची इमारत असावी व या इमारतीत पददलित वर्गाच्या उन्नतीचे सर्व कार्य करणारे कार्यालय असावे, हे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२५ सालापासूनच जोपासले होते, असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी उपस्थित राहण्यास इंग्लंडला गेले असताना, भारतातील संस्थानिक व राजे-रजवाडे यांना उद्देशून त्यांनी एक निवेदन काढले होते. नोव्हेंबर १९३१ मध्ये काढलेल्या या निवेदनात डॉ. आंबेडकरांनी डिप्रेस्ड क्लासेस इन्स्टिट्यूटची स्थापना (दलित वर्गाची संस्था) जून १९२५ मध्ये स्थापन झाल्याचे नमूद करून या संस्थेमार्फत पददलित वर्गाच्या उन्नतीसाठी करण्यात येणारे कार्य याचा उहापोह केला आहे. या संस्थेमार्फत जनता वृत्तपत्र चालविण्यात येते, हे वृत्तपत्र छापण्याचे छपाई यंत्र लहान असून त्यावर जनता पत्र छापण्याव्यतिरिक्त इतर व्यावसायिक कामे करता येत नाहीत, इत्यादी बाबी त्यांनी निवेदनात नमूद केल्या आहेत. या सर्व कार्यासाठी संस्थेला स्वतःच्या मालकीचे मध्यवर्ती कार्यालय बांधण्यासाठी जागा खरेदी करण्यासाठी आणि जनता वृत्तपत्र छापण्यासाठी अद्ययावत छापखाना खरेदी करण्यासाठी ४० हजार पौंड रकमेची आवश्यकता असून यासाठी भारतातील संस्थानिक व राजे-रजवाडे यांनी आर्थिक मदत करावी,असे आवाहन त्यांनी केले आहे. याच पत्रकात त्यांनी मागील वर्षात (१९३०) त्यांना संस्थानिक व राजे यांनी डिप्रेस्ड क्लासेस इन्स्टिट्यूटला देणगी म्हणून दिलेल्या १,३३५ पौंड (त्यावेळचे अंदाजे २८,००० रुपये) रकमेचा तपशील दिलेला आहे. (BAWS , VOL 17 , Part II पृ.क्र.४०७-४१२) यावरून भारत भूषण प्रिंटिंग प्रेसची यंत्रसामुग्री या रकमेतून खरेदी करण्यात आली असावी, असे अनुमान काढता येते. (बहिष्कृत भारत प्रेस फंडासाठी महार जातीच्या लोकांकडून देणगी रूपाने जुलै १९२९ अखेरपर्यंत मिळालेल्या एकूण रुपये ३,००१ चा तपशील वर्गणीदारांच्या नावासह बहिष्कृत भारताच्या विविध अंकांत छापण्यात आला आहे. बाबासाहेबांनी काढलेले हे निवेदन पाहता त्यांनी शेड्युल्ड कास्ट्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्टची नोंदणी प्रत्यक्षात १९४४ सालात केली असली तरी, याची योजना मात्र १९२५ सालीच तयार केली होती असे दिसून येते. पुढे दि.२ जुलै १९४२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची व्हॉईसरॉय कौन्सिलचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली. व्हॉईसरॉय कौन्सिलचे सदस्य असताना त्यांनी एप्रिल १९४४ मध्ये अस्पृशांच्या उन्नतीसाठी बांधण्यात यावयाच्या सोशल सेंटरच्या इमारतीसाठी ३ लक्ष २५ हजार रुपये इतक्या रकमेची आवश्यकता असून यासाठी भारतातील संस्थानिक व राजे-रजवाडे व इतर लोक यांनी आर्थिक मदत करावी, असे आवाहन केले आहे. या निवेदनात त्यांनी सोशल सेंटरच्या आवश्यकतेचा जो विस्तृत आराखडा सादर केला आहे. त्यावरून हे सोशल सेंटर म्हणजे अस्पृश्यांच्या स्वतःच्या मालकीची स्वतंत्र इमारत व त्या इमारतीत आपल्या संस्थांची कार्यालये व एखादा हॉल एवढ्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या स्वप्नातील सोशल सेंटरमधून अखिल भारतातील अस्पृश्यांची चळवळ यशस्वी करायची होती. चळवळ जर यशस्वी करायची असेल तर, त्यासाठी चळवळीच्या नियंत्रणात मुख्यतः तीन बाबी असल्याच पाहिजेतः १) केंद्रीय मुख्यालय २) योग्यरित्या प्रशिक्षित समर्पित कार्यकर्त्यांचा संच ३) चळवळीचा स्वतःचा आर्थिक आधार. या संसाधनाच्या आधारावरच निरंतर चालणारी मजबूत चळवळ उभी



Scanned by CamScanner

करता येईल असे त्यांचे स्वप्न होते. यासाठी त्यांनी ट्रस्टची स्थापना करून तेथे आपल्या चळवळीचे केंद्रीय मुख्यालय स्थापित करण्याचा ध्यास घेतला होता. या केंद्रीय मुख्यालयात, १ ) चळवळीच्या प्रमुख संघटनांची कार्यालये २) कार्यकर्त्यांसाठी निवारा ३) २,५०० आसन क्षमतेचे विविध कार्यक्रमासाठी उपयुक्त भव्य सभागृह ४) सर्व सोयींनी युक्त असे वाचनालय व अभ्यासिका ५) नियतकालिके व चळवळीचे साहित्य प्रकाशनाची शाखा व एक लहान छापखाना ६) समता सैनिक दल व तत्सम संघटनांचे मुख्यालय ७) नाट्य, कला, जलसा यासारख्या लोकशिक्षणाच्या कलांसाठी सुविधा केंद्र असे सात प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतील, असे लिखित स्वरूपात नमूद केले आहे (BAWS , VOL 17 , Part II पृ.क्र.४४७-४५४). बाबासाहेबांचे हे स्वप्न त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर ६० वर्षे लोटूनही अद्याप अपूर्ण आहे. हेच स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या,आता "पीपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट" नावाने ओळखल्या जाणाऱ्या सार्वजनिक विश्वस्त मंडळातर्फे पूर्ण करण्याचा निश्चय विश्वस्त मंडळाने केला आहे.

## बाबासाहेबांचे स्वप्न आतापर्यंत का पूर्ण होऊ शकले नाही?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक केंद्र पूर्ण करण्याचे स्वप्न उराशी बाळगून ते पूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न आपल्या हयातीत केला.यासाठी ट्रस्ट स्थापन करून लोकवर्गणी जमा करून ट्रस्टसाठी जागा विकत घेतली. त्यावर भव्य इमारत बांधण्यासाठी आपल्या वरिष्ठ वर्गातील मित्रांकडून तसेच हीरक महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने समाजबांधवांकडून पुरेसा पैसाही जमा केला. मात्र कोणत्या ना कोणत्या कारणास्तव त्यांचे सोशल सेंटर उभारण्याचे स्वप्न त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकले नाही. याची नेमकी कारणे शोधली असता ती खालीलप्रमाणे दिसतात.

१) जुलै १९४२ मध्ये बाबासाहेबांची व्हॉइसराय कौन्सिलचे सदस्य ( मंत्री ) म्हणून नेमणूक झाली. यामुळे त्यांना मुंबई येथून दिल्ली येथे कायमस्वरूपी मुक्काम हलवावा लागला. पुढे १९४६ साली त्यांची भारताच्या संविधान सभेचे सदस्य म्हणून व त्यानंतर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. पुढे ते स्वतंत्र भारताचे कायदा मंत्री बनले.या संपूर्ण कालावधीत म्हणजेच १९४२ ते १९५२ या दहा वर्षात त्यांचा मुंबईशी संपर्क फार कमी राहिला होता. या कालावधीत बाबासाहेबांनी ट्रस्टच्या जागेला केवळ ३ ते ४ वेळा भेट दिल्याचे त्यांनी लघुवाद न्यायालयातील १९५४ सालचा दावा क्रमांक १०९५ / ४९२० मध्ये वकिलांनी घेतलेल्या उलट तपासणीत सांगितले आहे. १९४४ ते १९४८ या काळात जागेचे व्यवस्थापन गणपत महादेव जाधव उर्फ मडके बुवा हे पहात होते. त्यांचे १९४८ साली निधन झाले. त्यानंतर या जागेचे व्यवस्थापन बाबासाहेबांचे सुपुत्र मा.यशवंतराव आंबेडकर हे करू लागले. बाबासाहेब १९५२ मध्ये मुंबईत परतल्यानंतर त्यांनी या जागेत लक्ष घालण्यास सुरुवात केली. या जागेतील काही भागात प्रेससाठी बांधण्यात आलेली इमारत पडून तेथे नवीन इमारत बांधण्याचा प्लॅन त्यांनी आर्किटेक्टकडून मंजूर करून घेतला. मात्र मा.यशवंतराव आंबेडकरांनी फेब्रुवारी १९४९ मध्ये या जागेत पाकिस्तानातून निर्वासित म्हणून आलेल्या तीन व्यक्तींना या जागेपैकी काही भाग भाड्याने दिला होता. इमारत बांधण्यास सुरुवात करण्यापूर्वी त्यांना हटविणे आवश्यक होते. बाबासाहेबानी त्यांना जागा खाली करून मागितली. परंतु त्यांनी ही जागा सोडण्यास नकार दिला. यामुळे त्यांना या जागेवरून हटविण्यासाठी बाबासाहेबानी स्वतः ट्रस्टच्या वतीने लघुवाद न्यायालयांत दावा दाखल केला. या दाव्याचा निकाल ऑक्टोबर १९५५ मध्ये ट्रस्टच्या बाजूने लागला. मात्र न्यायालयाने भाडेकरूना जागा खाली करण्यास तीन वर्षाची मुदत दिली. ही तीन वर्षाची मुदत कमी करावी म्हणून या निकालाविरुद्ध बाबासाहेबांनी अपील केले. या अपिलाचा निर्णय त्यांच्या हयातीत लागला नाही. यामुळे त्यांना या जागेवर त्यांच्या हयातीत इमारत बांधता आली नाही. त्यानंतर या भाडेकरूंनी ठेवलेल्या २० पोटभाडेकरूंनी कोर्टात दावा दाखल केला. त्या खटल्याचा निकाल फेब्रुवारी १९६२ मध्ये लागला. या निकालाविरुद्ध पोटभाडेकरूंनी पुन्हा वरच्या न्यायालयात अपील केले. ही न्यायालयीन प्रकरणे २००१ सालापर्यंत सुरु होती. २००१ मध्ये सर्व न्यायालयीन खटले समाप्त होऊन संपूर्ण जागा निर्विवादपणे ट्रस्टच्या ताब्यात आली.

२ ) बाबासाहेबांच्या हयातीत १९५३ मध्ये इमारत बांधण्यासाठी प्लॅन मंजूर करून घेण्यात आला होता. परंतु न्यायालयीन खटल्यामुळे या जागेवर कोणतेही बांधकाम करता आले नव्हते. पुढे १९६७ साली मुंबई महापालिकेने नवीन विकास आराखड्यात हा भूखंड माध्यमिक शाळेकरीता आरक्षित केला. यामुळे ट्रस्टचे तत्कालीन अध्यक्ष डी.जी. जाधव यांनी १९७३-७४ साली नवीन बांधकाम आराखडा महापालिकेच्या मंजुरीसाठी दाखल केला. या आराखड्यास महापालिकेने मंजुरी दिली नाही. तरीही नियोजित बांधकामास १९७४ मध्ये सुरुवात करण्यात आली. परंतु ट्रस्टकडे पुरेसा निधी नसल्यामुळे बांधकाम पूर्ण करता आले नाही. जून १९८२



Scanned by CamScanner

मध्ये महापालिकेने ट्रस्टने सादर केलेल्या बांधकामास अंतिम मंजुरी दिली. या आराखड्यानुसार तळमजल्यावर शाळेच्या बसेस व वाहनांसाठी पार्किंग, व त्यावर दोन माळ्यात शाळा आणि शाळेचे सभागृह बांधण्यास मंजुरी मिळाली. या मंजुरीनुसार बांधकाम पूर्ण करण्यासाठी सन १९८२ मध्ये ट्रस्टने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या दादर शाखेकडून ६ लाख रुपयाचे कर्ज मंजूर करून घेतले. या कर्जाचा पहिला हप्ता म्हणून बँकेने दोन लाख पन्नास हजार रुपये ट्रस्टच्या खात्यावर जमा केले. यातून अर्धवट राहिलेल्या इमारतीचे बांधकाम पुन्हा सुरु करण्यात आले. तळमजल्यावर पार्किंगच्या जागेचे बांधकाम १९८५ च्या आसपास पूर्ण झाले. मात्र यादरम्यान बँकेने वितरित केलेल्या कर्जाचे हप्ते व व्याज वेळच्यावेळी भरण्यात न आल्याने बँकेने उर्वरित रक्कम वितरीत केली नाही. यामुळे तळमजल्याच्या वरचे बांधकाम करता आले नाही. बांधकाम पूर्ण न झाल्याने या पार्किंगच्या जागेत वीजजोडणी,पाण्याची योग्य व्यवस्था,टॉयलेटची सोय इत्यादी सुविधा करता आल्या नाहीत. यामुळे येथे कोणत्याही मोठ्या सभा किंवा समारंभ घेता येणे शक्य नव्हते. या जागेत आंबेडकरी चळवळीच्या संदर्भात ऐतिहासिक महत्वाची म्हणता येईल, अशी एखादी सभा आयोजित करण्यात आल्याची नोंद नाही. मात्र १९८५ नंतर या जागेचा वापर लहानमोठ्या सभा, बैठका, इत्यादींसाठी करण्यात येऊ लागला. परंतु बाबासाहेबांच्या स्वप्नातील चळवळीचे मुख्यालय किंवा सोशल सेंटर येथे अद्यापही अस्तित्वात येऊ शकले नाही.

## बाबासाहेबांच्या स्वप्नातील सोशल सेंटर उभारण्यासाठी ट्रस्टींनी केलेले प्रयत्न

न्यायालयीन प्रकरणे समाप्त होऊन जागेचा संपूर्ण ताबा ट्रस्टला मिळण्यास २००१ साल उजाडले.१९७४ साली बांधण्यास सुरुवात केलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण न झाल्याने ही इमारत अर्धवट स्थितीत होती. इमारतीच्या वरच्या मजल्याचे बांधकाम करण्यासाठी लोखंडी कैच्या लावल्या होत्या. त्या गंजून जाऊन बांधकामावर त्याचा परिणाम होत होता. कालावधीत पाऊस व इतर नैसर्गिक कारणांमुळे इमारतीचे बांधकाम कमजोर झाले. प्रेसची इमारत १९४५ - ४६ सालच्या दरम्यान तापुरत्या स्वरूपाची बांधण्यात आली होती. ही इमारत अत्यंत जीर्ण झाली होती. या सर्व बाबी विचारात घेऊन या इमारती निष्कासित करून नवीन अद्ययावत इमारत बांधण्यासाठी ट्रस्टींनी तयारी सुरु केली. मात्र यामध्ये मुख्य अडचण म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडियाने कर्जाच्या वसुलीसाठी न्यायालयात दाखल केलेला दावा ही होती. ट्रस्टला बँकेने वितरित केलेल्या अडीच लाख रुपयाचे व्याज व त्यावरील चक्रवाढ व्याज हे सर्व मिळून बँकेने एकूण १२ लाख रुपयांच्या मागणीसाठी ट्रस्टवर दावा दाखल केला होता. ट्रस्टच्या जमिनीची कागदपत्रे तारण म्हणून बँकेकडे होती. त्याचप्रमाणे महापालिकेच्या मालमत्ता कराचे १ लक्ष २० हजार रुपये देणे थकले होते. यामुळे कराच्या वसुलीसाठी महापालिकेने ट्रस्टची जमीन जप्त करण्याची नोटीस बजावली होती. बँकेने जमीन जप्त करून त्यावर कोर्ट रिसिव्हर नेमण्याची तयारी चालविली होती. या बिकट परिस्थितीत तत्कालिन चेअरमन मान.आर.जी. खरात तसेच सेक्रेटरी मान. प्रा. व्ही.एस.आसवारे यांनी त्यांच्या ओळखीचे वर्षा कॅटरर्सचे मालक श्री. सुनील शहा यांची मदत घेऊन वर्षा कॅटरर्स व ट्रस्टमध्ये एक करार केला.त्यानुसार वर्षा कॅटरर्सनी बँकेचे कर्ज फेडण्यासाठी व महापालिकेचा कर भरण्यासाठी आगाऊ रक्कम ट्रस्टला द्यावी व याबदल्यात ट्रस्टच्या बांधकामात आवश्यक दुरुस्ती करून येथे होणाऱ्या लग्नसमारंभ व इतर कार्यासाठी ३ वर्ष मंडप व कॅटरिंग सुविधा पुरवावी, असे ठरले. यानंतर बँकेशी वाटाघाटी करून कर्ज फेडण्यात आले व जागा पूर्णपणे बोजारहित करण्यात आली. यानंतर ट्रस्टचे उत्पन्न वाढविण्यासाठी व इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी ट्रस्टींनी प्रयत्न सुरु केले.मात्र याच कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू व भारिप बहुजन महासंघ या राजकीय पक्षाचे प्रमुख माननीय प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी ट्रस्टच्या विरोधात सरकारकडे तक्रार केली. या तक्रारीत विश्वस्तांवर आर्थिक गैरव्यवहार करणे, ट्रस्टची मालमत्ता व भंगार बेकायदा विकणे, मंडप व केटरर्स ठेकेदाराकडून मिळालेल्या रकमांची अफरातफर करणे असे अनेक गंभीर आरोप केले होते. या तक्रारीच्या अनुषंगाने, पोलिसांनी ट्रस्टच्या आर्थिक व्यवहाराची व इतर अनेक बाबींची चौकशी केली. या चौकशीत माननीय प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी ट्रस्टच्या विरोधात केलेल्या तक्रारीत कोणतेही तथ्य दिसून आले नाही;असा स्पष्ट निर्वाळा पोलिसांनी दिला. या तक्रारीमुळे विश्वस्तांना बराच त्रास झाला व इमारत पूर्ण करण्याच्या प्रयत्नांस पुन्हा खीळ बसली. मात्र कोणत्याही परिस्थितीत बाबासाहेबांचे सोशल सेंटर उभारण्याचे स्वप्न पूर्ण करायचेच या ध्येयाने झपाटून ट्रस्टींनी इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी सरकरकडून व इतर मार्गाने निधी जमा करण्याचा प्रयत्न चालविला होता. याचाच एक भाग म्हणून खाजगी विकासकामार्फत नवीन आराखड्यानुसार इमारत बांधता येईल काय, याचेही प्रयत्न ट्रस्टींनी केले. परंतु त्यास यश आले नाही. या दरम्यान महाराष्ट्र सरकारने २९ मार्च

२०११ रोजी ट्रस्टला १० कोटी रुपयाचे अर्थसहाय्य मंजूर केले. ही रक्कम ट्रस्टने अद्याप खर्च केलेली नाही.

**ट्रस्टच्या नावात तसेच घटना व नियमांत बदल व नवीन सदस्यांची नेमणूक**

ट्रस्टच्या संस्थापक सदस्यांपैकी मान.जी.एम.जाधव ( मडकेबुवा ) मान.दादासाहेब गायकवाड मान.डी.जी.जाधव, मान.जी.टी.परमार, मान.शांताराम उपशाम गुरुजी, मान.पी.एन.राजभोज, मान.बी.एच.वराळे, मान.पी.एल.लोखंडे, मान.दादासाहेब शिर्के, मान.एस.एस.डिखळे, मान. आर.जी.खरात, मान.प्रा. यादवराव गांगुर्डे इत्यादी विश्वस्त त्यांपैकी बहुतेकांनी प्रत्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसोबत कार्य केले होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी नवीन विश्वस्त नियुक्त करण्यात आले. यामध्ये मान.जी.के.माने, मान. डॉ.पी.टी.बोराळे, मोरेश्वर तांबे, मान. जे.डी. जाधव, मान.प्रा. व्ही.एस.आसवारे, मान. ए.एस.उपशाम, मान.प्राचार्य डॉ.एस.एस.धाकतोडे, ॲडव्होकेट श्रीकांत गवारे यांचा समावेश होता. यापैकी मान.जी.के.माने, मान. डॉ.पी.टी.बोराळे, मान. मोरेश्वर तांबे, मान.जे.डी. जाधव आता हयात नाहीत. त्यांच्याऐवजी पुढे मान, विलास वाघ, मान.वसंत धावरे, मान.शंकरराव गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली. सन २००४ मध्ये विश्वस्तांनी एकमताने ठराव करून ट्रस्टचे ''दि बॉम्बे शेड्युल्ड कॉस्टस इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट " हे नाव बदलून ''दि पिपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट" हे व्यापक नाव धारण केले. तसेच ट्रस्टच्या घटना व नियमावलीमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. यात मुख्य सुधारणा ही वयाच्या अटींबाबतची होती. सुधारित नियमानुसार, विश्वस्त सदस्याचे निवृत्तीचे वय ७५ वर्षे सर्वानुमते ठरविण्यात आले. वृद्धत्वामुळे त्यास ट्रस्टच्या कामकाजात सहभागी होणे अशक्य होत असेल तर वयाच्या ७५ व्य वर्षी सदस्यास निवृत्त करण्यात येईल. परंतु संबंधित सदस्याचे प्रकृतिमान उत्तम असेल आणि तो ट्रस्टचे कामकाज करण्यास सक्षम असेल तर त्यास विश्वस्त मंडळ एक विशेष बाब म्हणून आणखी पाच वर्षे मुदतवाढ देऊ शकेल, अशी तरतूद करण्यात आली. यानुसार सन्माननीय सदस्य वसंत धावरे तसेच सन्माननीय सदस्य ए.एस.उपशाम यांची पाच वर्षांची मुदतवाढ संपल्यानंतर वयाच्या ८० वर्षानंतर ते निवृत्त झाले. डॉ.एस.एस.धाकतोडे, मान, विलास वाघ यांची वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे ते निवृत्त झाले. मान.शंकरराव गायकवाड यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिला.ट्रस्टचे चेअरमन सन्माननीय प्रा. व्ही.एस.आसवारे यांच्यावर २०१२ मध्ये एक गंभीर स्वरूपाचा फौजदारी गुन्हा दाखल झाला. या गुन्ह्याचा आधार घेऊन त्यांना अध्यक्षपदावरून काढून टाकण्यात यावे, यासाठी भारिप बहुजन महासंघ,रिपब्लिकन सेना, रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांनी उग्र स्वरूपाचे आंदोलन केले. यामुळे त्यांना दिनांक १-१- २०१३ रोजी अध्यक्षपदावरून मुक्त करण्यात आले. त्यांना दिनांक १४ -०७ - २०१४ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे ट्रस्टच्या घटनेतील तरतुदीनुसार ते निवृत्त झाले आहेत. या सर्व कारणांमुळे निवृत्त झालेल्या सदस्यांच्या ऐवजी नवीन सदस्यांची नियुक्ती ट्रस्टच्या घटनेतील तरतुदीनुसार करण्यात आली आहे व त्यासंबंधात धर्मादाय आयुक्त कार्यालयास अहवाल सादर करून विश्वस्त मंडळाने सर्वानुमते घेतलेल्या ठरावानुसार नवीन ट्रस्टीची नोंद घेण्याचे कळविण्यात आले आहे.

**ट्रस्ट विरुद्धच्या तक्रारी व चौकशांचा ससेमिरा आणि**
**विश्वस्तांवरील हल्ले, धमक्या, शिवीगाळ इत्यादी.**

ट्रस्टच्या संपूर्ण इतिहासांत प्रत्येक वेळी कार्यरत असलेल्या विश्वस्तांनी कोणत्याही परिस्थितीत बाबासाहेबांचे सोशल सेंटर उभारण्याचे स्वप्न पूर्ण करायचेच या ध्येयाने झपाटून इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले,हे कोणीही नाकारणार नाही. मात्र हे करीत असताना त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला ही वस्तुस्थिती आहे. एकीकडे सामाजिक व राजकीय कार्याच्या व्यापातून वेळ काढून,आपला नोकरीधंदा सांभाळून ट्रस्टच्या कामासाठी वाहून घ्यायचे आणि दुसरीकडे बाबासाहेबांचे सोशल सेंटरचे स्वप्न पूर्ण होऊ नये म्हणून ट्रस्टच्या विरोधी कारवाया करणाऱ्या स्वकीयांकडून होणारी बदनामी सहन करायची, बिनबुडाच्या आरोपामुळे मानसिक कुचंबणा सहन करायची या दिव्यातून ट्रस्टवर विश्वस्त म्हणून काम केलेल्या व आताही करीत असलेल्या सर्वांनाच जावे लागले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इमारत फंडाच्या केलेल्या घोषणेनंतर पहिल्या दिवसापासून ट्रस्टच्या देणग्यांचा हिशोब ठेवणारे शांताराम उपशाम गुरुजी यांनी ते १९५५ मध्ये शिक्षणाधिकारी म्हणून निवृत्त होईपर्यंत कोणताही मोबदला न घेता निरलसपणे ट्रस्टचे सर्व कामकाज पहिले. ते निवृत्त झाल्यानंतर १९७५ मध्ये त्यांचा मृत्यू होईपर्यंत त्यांनी पूर्णवेळ ट्रस्टच्या कामास वाहून घेतले. त्यांनी ट्रस्टच्या १९३८ ते १९६५ या सत्तावीस वर्षाच्या कारकिर्दीचा संपूर्ण अहवाल १९६७ साली प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी ट्रस्टला २५ रुपयांच्या वर देणगी दिलेल्या प्रत्येक व्यक्तीचा व संस्थेचा तपशील नावानिशी व पत्यानिशी लिहून ठेवला आहे. अशा या अत्यंत त्यागी समर्पित व्यक्तीवरही ट्रस्टच्या पैशातून घर बांधल्याचा, ट्रस्टच्या पैशाने मुलाला परदेशी

पाठविल्याचा आरोप करण्यात आला होता. माननीय उपशाम गुरुजींनी ट्रस्टच्या अहवालात प्रत्येक पै-पैशाचा हिशोब देऊन व योग्य ते पुरावे देऊन आरोपकर्त्यांची तोंडे बंद केली. मान. डॉ.पी.टी.बोराळे यांनाही ट्रस्टच्या विरोधी कारवाया करणाऱ्या काही स्वकीयांकडून अर्धनग्न करून जबर मारहाण करण्यात आली होती. सन २००६ मध्ये मान. ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांनी ट्रस्टच्या सदस्यांच्या विरोधात अनेक आरोप लावून पोलीस तक्रार केली, हे वर आलेच आहे. त्यानंतरही राजेंद्र आनंद पवार या व्यक्तीने दि.२९ जानेवारी २०१४ रोजी ट्रस्टच्या विरोधात एक तक्रार धर्मादाय आयुक्तांकडे केली. या तक्रारीची चौकशी धर्मादाय आयुक्तांनी करून तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याचा निर्वाळा दिला. तरीही खोट्यानाट्या तक्रारी करण्याचे सत्र अजून थांबलेले नाही.सन २००६ मध्ये भटक्या विमुक्तांचे बौद्ध धम्मात धर्मांतर करण्यासाठी धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीतर्फे एक भव्य कार्यक्रम मुंबईतील रेसकोर्स मैदानावर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजक दैनिक सम्राटचे संपादक बबन कांबळे व भटक्यांचे नेते लक्ष्मण माने यांच्या विनंतीवरून ट्रस्टने धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव समितीला तात्पुरते कार्यालय स्थापन करण्यासाठी ट्रस्टच्या इमारतीत जागा दिली.यावरून मान.आनंदराज प्रचंड संतापले. आदरणीय मीराताई आंबेडकर यांची भारतीय बौद्ध महासभा कार्यरत असताना दुसऱ्या नावाने धम्माचे काम करणाऱ्या संस्थेला तुम्ही बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या ट्रस्टच्या इमारतीत जागा कशी काय दिली,असे म्हणून त्यांनी विश्वस्त मान.अनंत उपशाम, मान.वसंतराव धावरे, मान. प्रा. व्ही.एस आसवारे यांना प्रचंड शिवीगाळ केली व हातपाय तोडण्याची धमकी दिली.याची लेखी तक्रार दिनांक ७-१०-२००६ रोजी भोईवाडा पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. त्यानंतर दि.५ डिसेंबर २०१० ट्रस्टचे सचिव ॲडव्होकेट श्रीकांत गवारे यांना भारिप बहुजन महासंघाचे कार्यकर्ते प्रतीक धनराज कांबळे व प्रसेनजीत धनराज कांबळे यांनी मारहाण केली.दुसरे विश्वस्त डॉ.एस.एस.धाकतोडे यांच्या अंगावर ते धावून गेले. कार्यालयातील टेबलावरील काचा व सामान फोडले.याचीही तक्रार दिनांक १०-१२-२०१० रोजी भोईवाडा पोलीस स्टेशनला करण्यात आली होती.दिनांक २६ डिसेंबर २०१५ रोजी मान.आनंदराज आंबेडकर यांचा वाहनचालक श्री.राकेश गायकवाड याने ट्रस्टचे सल्लागार श्री. रत्नाकर गायकवाड व त्यांची मुलगी शिवांजली गायकवाड यांच्या अंगावर टोयाटो क्वालिस गाडी घालून त्यांना जीवे ठार करण्याचा प्रयत्न केला होता. याचीही तक्रार दिनांक २६-१२-२०१५ रोजी भोईवाडा पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. यानंतर १९ एप्रिल २०१६ रोजी ट्रस्टचे अध्यक्ष योगेश वऱ्हाडे व सदस्य श्री. नागसेन सोनारे यांची गाडी वरळी येथे रस्त्यात अडवून त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ट्रस्टच्या सदस्यांना अनेक वेळा शिवीगाळ करणे, अपमानित करून अंगावर धावून जाणे हे प्रकार कायमच करण्यात येत होते. याबाबत पोलिसांना वेळोवेळी सूचित करून संरक्षण मागण्यात आले होते. यामुळे पोलिसांनी येथे ठराविक वेळेत गस्तही सुरु केली होती. इतके सर्व दहशतीचे वातावरण व प्रसंग याना तोंड देऊन ट्रस्टींनी बाबासाहेबांचे सोशल सेंटरचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जीव धोक्यात घालून काम केले व अजूनही करीत आहेत.

**बाबासाहेबांच्या सोशल सेंटरच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल !**

वयोवृद्ध झालेले व वयोमानानुसार पूर्ण क्षमतेने कार्य करण्यास असमर्थ झालेले सदस्य निवृत्त झाल्यानंतर चळवळीत निरपेक्षपणे, कोणताही गाजावाजा न करता काम करणाऱ्या नव्या अनुभवी सदस्यांची नियुक्ती ट्रस्टच्या घटनेतील तरतुदीस अनुसरून करण्यात आली. या सदस्यांनी लगेच कामाचा धडाका लावला. चळवळीचं मुख्यालय असलेल्या सोशल सेंटरच्या ३ मजली इमारतीची जी कल्पना बाबासाहेबानी मांडली होती, त्यास ७५ वर्षांचा कालावधी लोटला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अखंड परिश्रम घेऊन येथील व्यवस्थेशी केलेल्या संघर्षामुळे त्यांनी उभी केलेली चळवळ या पाऊण शतकात आणखी विस्तृत झाली होती. बाबासाहेबांची ओळख केवळ अस्पृश्यांचे पुढारी किंवा भारतीय संविधानाचे निर्माते एवढ्यापुरतीच मर्यादित न राहता, ते अखिल जगातील अन्यायग्रस्त,शोषित पीडित लोकांच्या संघर्षाचे स्फूर्तिस्थान बनले. जगात आतापर्यंत होऊन गेलेल्या अग्रगण्य महापुरुषांपैकी एक असे युगपुरुष म्हणून बाबासाहेबांना जग ओळखू लागले. बाबासाहेबांच्या संघर्षाचा,विचारांचा,तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी देशोदेशींचे विद्वान,संशोधक,अभ्यासक भारतात येऊ लागले. बाबासाहेबांचे हे जागतिक स्तरावरील महत्व आणि त्यांना शोषितांचा मुक्तिदाता म्हणून लाभलेले अढळ स्थान लक्षात घेऊन या महापुरुषाच्या नावाने उभे राहणारे, बाबासाहेबांच्या चळवळीचे मुख्यालयही तसेच भव्यदिव्य असावे,जगातील संपूर्ण शोषितांना प्रेरणा देणारे असावे, असे पिपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्टने ठरविले.बाबासाहेबांच्या चळवळीचे मुख्यालय म्हणून उभे राहणारे सोशल सेंटर अत्याधुनिक तर असावेच परंतु जो कोणी या मुख्यालयात



Scanned by CamScanner

येईल त्याला कोणताही ग्रंथ न वाचता, कोणाला काहीही न विचारता बाबासाहेबांची समग्र चळवळ समजावी; अशा स्वरूपात हे सोशल सेंटर निर्माण करण्याचा चंग ट्रस्टींनी बांधला. यानुसार बाबासाहेबांशी संबंधित वस्तूंचे म्युझियम, बाबासाहेबांच्या चळवळीची इत्थंभूत माहिती देणारे कायमस्वरूपी चित्रप्रदर्शन यांसह अनेक संकल्पना प्रत्यक्ष साकार करण्याचा संकल्प ट्रस्टींनी केला. मात्र यात असंख्य अडचणी होत्या. यापैकी सर्वात मोठी अडचण म्हणजे मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात ही जागा शाळेच्या इमारतीसाठी आरक्षित करण्यात आली होती.यामुळे या जागेवर शाळेशिवाय अन्य काहीही बांधकाम करता येत नव्हते. ट्रस्टने यासंबंधात महापालिकेशी पत्रव्यवहार सुरु केला. मात्र हे आरक्षण उठविणे महापालिकेच्या नव्हे तर सरकारच्या अखत्यारीत होते. ही बाब अत्यंत किचकट,वेळखाऊ आणि जिकिरीची होती. कितीही त्रास झाला तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सोशल सेंटर उभारण्याचे स्वप्न पूर्ण करायचेच या ध्येयाने ट्रस्टची सदस्य मंडळी झपाटलेली होती. यामुळे बाबासाहेबांच्या स्वप्नांशी, आंबेडकरवादी चळवळीच्या मुख्यालयाशी काहीही देणे-घेणे नसलेल्या लोकांकडून सातत्याने होणारी शिवीगाळ,करण्यात येणारा अपमान, वेळप्रसंगी करण्यात येणारे हल्ले,जीवे ठार मारण्याचे प्रयत्न या कशालाही न घाबरता ट्रस्टच्या सदस्यांनी निर्धाराने आपले कार्य सुरु ठेवले. यासाठी पहिल्या प्रथम पालिकेच्या विकास आराखड्यात ट्रस्टच्या मालकीच्या जागेवर दर्शविण्यात आलेले ''माध्यमिक शाळा " हे आरक्षण रद्द करणे आवश्यक होते.कारण त्यानंतरच या जागेवर सार्वजनिक उपयोगासाठी सभागृह बांधणे शक्य होते. यामुळे ट्रस्टींनी यासाठी पाठपुरावा सुरु केला.मात्र हे काम वाटते तितके सोपे नव्हते. यासाठी मंत्रालयाच्या अनेक विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन त्यानंतर राज्यपालांची मंजुरी घेऊन सरकारी अधिसूचना काढणे आवश्यक होते. या कामासाठी मंत्रालयातील कार्यपद्धतीची पुरेपूर माहिती असणारी व्यक्ती ट्रस्टची मदतगार असणे गरजेचे होते. याच गरजेपोटी ट्रस्टच्या सदस्यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव मान.रत्नाकर गायकवाड यांची भेट घेऊन त्यांना या कामात वेळोवेळी सल्ला व मदत देण्याची विनंती केली. ट्रस्टच्या सदस्यांच्या विनंतीला मान देऊन आणि आपण खुद्द बाबासाहेबांच्या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी हातभार लावतो आहोत याचे भान ठेऊन मान.रत्नाकर गायकवाड यांनी ट्रस्टचे सल्लागार म्हणून या कामात मदत करण्याची जबाबदारी स्वीकारली. यासाठी स्वत: आपले पद आणि प्रोटोकॉल बाजूला ठेऊन मंत्रालयातील कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांपासून ते थेट मुख्यमंत्र्यापर्यंत व्यक्तिश: भेट घेतली.या जागेवर समाजाच्या स्वत:च्या मालकीचा हॉल आणि चळवळीचे मुख्यालय उभारण्याचे बाबासाहेबांचे स्वप्न यासंदर्भातील माहिती त्यांनी सर्वांना पटवून दिली. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन सरकारने ट्रस्टच्या जागेवरील ''माध्यमिक शाळा " हे आरक्षण रद्द करून त्याऐवजी ''पब्लिक हॉल अँड इन्स्टिट्यूशनल युज" असे आरक्षण बदलून दिले. याबाबतची राज्यपालांच्या मंजुरीची अधिसूचना सरकारने दिनांक ३ डिसेंबर २०१५ रोजी जारी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सोशल सेंटर उभारण्याचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही फार मोठी गोष्ट होती.कारण ट्रस्टच्या जागेचा उपयोग आता खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या स्वप्नातील चळवळीचे मुख्यालय आणि सामाजिक केंद्र यासाठी करता येणार होता. जागेच्या वापराचे आरक्षण सरकारने बदलून दिल्यानंतर ट्रस्टने मुंबई महानगर पालिकेकडून या जागेवर अत्याधुनिक पद्धतीची १७ मजल्यांची भव्य इमारत बांधण्याचा नियोजित इमारत आराखडा मंजुरीसाठी सादर केला.महापालिकेने आवश्यक तपासण्या करून व नियोजित इमारत बांधण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही,याची खात्री करून इमारत बांधण्याचे ट्रस्टचे इरादापत्र मंजूर केले व त्यासंदर्भातील परवानगी म्हणजेच **आय.ओ.डी.**दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी ट्रस्टला दिली. अशा प्रकारे ट्रस्टने ७५ वर्षांपासून उराशी बाळगलेले बाबासाहेबांचे सोशल सेंटरचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने एंक-एक पाऊल पुढे सरकू लागले.बाबासाहेबांच्या सोशल सेंटरच्या स्वप्नपूर्तीच्या मार्गातील दुसरा मोठा अडथळा म्हणजे १९४५-४६ च्या दरम्यान बांधलेली, जेथे अर्धवट बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस आहे ती अत्यंत जर्जर अवस्थेत असलेली इमारत व १९८२-८५ दरम्यान अर्धवट बांधकाम केलेली जीर्ण झालेली इमारत निष्कासित करणे हा होता. ट्रस्टने जरी सोशल सेंटरची नवीन १७ मजली अत्याधुनिक इमारत बांधायचा संकल्प केला असला तरी या जागेशी आंबेडकरी जनतेचे भावनिक नाते जोडलेले आहे, याची जाणीव ट्रस्टच्या सदस्यांना आहे. या इमारतीतील एका खोलीत मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील भारिप बहुजन महासंघाचे कार्यालय होते. त्याचप्रमाणे मान.भीमराव आंबेडकर चालवीत असलेल्या बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेसची मशिनरी ट्रस्टच्या जागेत आहे.ती जागा त्यांच्या ताब्यात आहे.तसेच मान. आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेचे कार्यालय ट्रस्टच्या जागेत आहे. यासंदर्भात त्यांच्याशी वाटाघाटी करून त्यांना नियोजित इमारतीत मोठ्या क्षेत्रफळाची जागा देऊन बाबासाहेबांच्या सोशल सेंटरच्या स्वप्नपूर्तीच्या कार्यात त्यांचे सहकार्य लाभावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु



Scanned by CamScanner

करण्यात आले.

## आंबेडकर भवन पाडण्याचा घटनाक्रम

जागेच्या वापराचे आरक्षण बदलून मिळाल्यानंतर ट्रस्टने महापालिकेकडून आवश्यक परवानग्या मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यानुंसार महापालिकेने जागेची मालकी व इतर आवश्यक तपासण्या करून या जागेवर नवीन बांधकाम करण्यास आवश्यक अटी पूर्ण करण्याची सूचना ( IOD ) दिनांक १३ एप्रिल २०१६ रोजी ट्रस्टला दिली. बांधकाम सुरु करण्याची पूर्वशर्त म्हणून IOD प्राप्त झाल्यानंतर इमारत बांधकाम करण्यासाठी मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यांची सहमती मिळविण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले. या प्रयत्नाचा भाग म्हणून त्यांची समक्ष भेट घेण्याचे प्रयत्न ट्रस्टच्या सदस्यांनी वारंवार केले. मात्र त्यास मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. मात्र मान. आनंदराज आंबेडकर यांनी तसेच मान. भीमराव आंबेडकर यांनी ट्रस्टच्या सदस्यांच्या विनंतीला मान देऊन ट्रस्टचे म्हणणे ऐकून घेतले. या दोघांनीही मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्यासह नियोजित इमारतीचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन पाहण्यासाठी दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी बैठक निश्चित करण्यास मान्यता दिली. मात्र या बैठकीस मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यांपैकी कोणीही उपस्थित झाले नाही. शेवटी ट्रस्टींनी अनेक वेळा विनंती केल्यानंतर मान. भीमराव आंबेडकर यांनी दिनांक १२ मे २०१६ रोजीची वेळ दिली व ते भेटले. या भेटीत त्यांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन दाखविण्यात आले. ते पाहुन त्यांनी समाधान व्यक्त केले व बांधकामास सहकार्य करण्यासाठी तीन अटी ठेवल्या. त्या ३ अटी अशा :- क्र. १ ) आंबेडकर भवनात सध्या त्यांच्या वापरात असलेल्या जागेच्या बदल्यात, नियोजित इमारतीत त्यांना जागा देण्यात यावी. २) बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेसची जागा त्यांच्या कुटुंबियांची मिळकत असल्याने तिची मालकी त्यांना देण्यात यावी.मालकी हक्क सिद्ध करणारे वैध कागदपत्र पुढील ५ दिवसांत देण्याचे त्यांनी कबूल केले. ३) ट्रस्टमध्ये त्यांना व मान. बाळासाहेब आंबेडकर यांना विश्वस्त करून घ्यावे. या तीन अटींपैकी नियोजित इमारतीत त्यांना जागा देण्याची अट मान्य करण्यात आली. बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेसच्या जागेचे मालकी हक्क सिद्ध करणारे वैध कागदपत्र त्यांनी दिल्यास ही जागा त्यांना देण्याची आताही मान्य करण्यात आली. मात्र बाबासाहेबांनी ठरविलेल्या व ट्रस्टने मागील ६० वर्षे अवलंबिलेल्या धोरणांस अनुसरून त्यांना व मान. बाळासाहेब आंबेडकर यांना विश्वस्त करून घेण्याची अट ट्रस्टने मान्य केली नाही. या सर्व बाबीसंदर्भात त्यांना दिनांक १६ मे २०१६ रोजी लेखी पत्र देऊन कळविण्यात आले. त्यानंतरही त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यांना दिनांक २५ एप्रिल २०१६ रोजी लेखी पत्र देऊन विद्यमान इमारत पाडण्यात येणार असल्याची कल्पना देण्यात आली. या इमारतीत असलेली त्यांची कार्यालये व त्यातील सामान हलवून सुरक्षित ठेववण्याबाबत त्यांना लेखी कळविण्यात आले. त्यानंतर दैनिक लोकसत्ताच्या दिनांक ४ मे २०१६ च्या अंकात यासंबंधीची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. या सर्व कालावधीत मान. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यापैकी कोणीही ट्रस्टला काहीही उत्तर दिले नाही किंवा नियोजित इमारतीचे बांधकाम सुरु करण्याच्या ट्रस्टच्या प्रयत्नांस कोणताही आक्षेप घेतला नाही. IOD मध्ये नमूद अटी पूर्ण करण्याच्या दृष्टीने या जागेवर उभे असलेले बांधकाम, त्याची मजबुती व सुरक्षितता तपासण्याची विनंती ट्रस्टने महानगरपालिकेला केली. महापालिकेच्या सूचनेनुसार या इमारतीचे बांधकाम तज्ज्ञांमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. तज्ज्ञांनी दिलेल्या अहवालानुसार महानगरपालिकेने ही इमारत वापरास अयोग्य /धोकादायक म्हणून घोषित केली व त्यानुसार मुंबई महापालिका अधिनियमाच्या अनुच्छेद ३५४ नुसार, एक महिन्याच्या आत ही इमारत निष्कासित करण्याची नोटीस दिनांक १ जून २०१६ रोजी ट्रस्टला दिली. ही नोटीस मिळाल्यानंतर त्यासंदर्भातील सूचना इमारतीच्या दर्शनी दरवाजावर चिकटविण्यात आली. या इमारतीत कार्यालय असलेले भारिप बहुजन महासंघ या पक्षाचे नेते मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर, रिपब्लिकन सेनेचे नेते मान. आनंदराज आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर,भारतीय बौद्ध महासभेचे नेते मान. भीमराव आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर ही नोटीस चिकटविण्यात आली. या इमारतीचे पाडकाम करण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्याची विनंती २१ जून २०१६ च्या पत्रान्वये भोईवाडा पोलीस ठाण्याला करण्यात आली. त्यानंतर आंबेडकरी समाजात प्रामुख्याने वाचल्या जाणाऱ्या दैनिक सम्राट, दैनिक जनतेचा महानायक, दैनिक लोकनायक या वृत्तपत्रांत नियोजित इमारतीच्या संदर्भात लागोपाठ ३ दिवस जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. या सर्व काळात व घडामोडीच्या

दरम्यान आंबेडकर भवनचे पाडकाम करण्यास मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यापैकी कोणीही कोणताही आक्षेप घेतला नाही किंवा या कृतीला न्यायालयात आव्हान दिले नाही. यावरून पिपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्टने जीर्ण झालेले आंबेडकर भवन नावाने परिचित असलेले ट्रस्टच्या जागेवरील बांधकाम निष्कासित करून त्याऐवजी नवीन इमारत बांधणाऱ्यांची कृती पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने, कोणालाही अंधारात न ठेवता, योग्य ती प्रसिद्धी देऊन केली असल्याचे दिसून येईल.

आंबेडकर भवन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या १९८४-८५ दरम्यान अर्धवट बांधकाम केलेल्या प्रस्तावित शाळेच्या इमारतीच्या पार्किंग एरियाचे पाडकाम कोणत्या परिस्थितीत व कशाप्रकारे करण्यात आले, याची जशी घडली तशी माहिती वर दिलेली आहे. मात्र याविषयी खोट्या अफवा व असत्य माहिती लोकांमध्ये पसरवून लोकांना भावनात्मक करण्यात आले. वस्तुस्थिती लपवून केवळ आणि केवळ असत्याचा कपोलकल्पित कथांवर आपल्या राजकीय आणि आर्थिक स्वार्थासाठी या संपूर्ण प्रकरणाचा वापर करण्यात आला. यातील काही असत्य गोष्टींचे वस्तुस्थितीवर आधारित स्पष्टीकरण देणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.यातील काही प्रमुख बाबी अशा :-

**१) आंबेडकर भवन वसा आणि वारसा या सदरांत मोडणारी हेरिटेज वास्तू आहे काय ?**

एखादी ऐतिहासिक वास्तू, स्थळ, किंवा महापुरुषाच्या जीवनातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्वाच्या घटनांशी निगडित असलेला परिसर,कलाकृती, वस्तू वसा आणि वारसा (Heritage ) म्हणून जतन करण्याच्या संदर्भात केंद्र सरकारने खालील कायदे पारित केले आहेत. १) प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष कायदा १९५८ व त्याखालील नियम १९५९. (२) पुरातन वास्तू आणि कलाकृती कायदा १९७२ (३) प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष ( सुधारणा व वैधता ) कायदा २०१०. काही राज्यांनी आपापल्या राज्यांची प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष यांच्याशी निगडित कायदे पारित केले आहेत. महाराष्ट्रात मात्र केंद्र सरकारचाच कायदा लागू आहे. या कायद्यानुसार ज्या वास्तूचे ऐतिहासिक वास्तुशिल्प म्हणून महत्व आहे, ऐतिहासिक प्रसंगाशी निगडित परिसर म्हणून महत्त्व आहे, ऐतिहासिक महापुरुषाच्या महत्वाच्या जीवन प्रसंगाशी निगडित महत्व आहे अशा इमारतीला, परिसराला,कलाकृतीला, वस्तूला हेरिटेज म्हणून घोषित केले जाऊ शकते. ही घोषणा केंद्र किंवा राज्य सरकार पुरातत्व खात्याच्या किंवा संबंधित राज्याच्या हेरिटेज कन्झर्वेशन कमिटीच्या शिफारसीनुसार, शासकीय अधिसूचना काढून करू शकते. हेरिटेज म्हणून घोषित झालेली इमारत, परिसर, कलाकृती, वस्तू ही त्याचा कालावधी, ऐतिहासिकता, पर्यावरणीय महत्व, वास्तुशास्त्र व शिल्पकला यानुसार महत्व, महापुरूषाशी निगडित प्रसंगाचे महत्व यानुसार संरक्षित किंवा असंरक्षित अशा वर्ग -१, वर्ग-२ वर्ग- ३ प्रकारात मोडते. या वास्तूच्या देखभाल करण्याचे,जतन करण्याचे, दुरुस्ती करण्याचे, संपूर्ण नष्ट करून नव्याने बांधण्याचे नियम सरकार ठरवून देते. अशी घोषणा करावी म्हणून संबंधित इमारत, वस्तू, कलाकृती याच्या मालकांनी, धारकांनी स्वत:हून मागणी केली तर संबंधित राज्याची हेरिटेज कन्झर्वेशन कमिटी त्या मागणीची संयुक्तिकता तपासते, सर्वेक्षण करते आणि त्यानुसार सरकारला कळविते. संबंधित मालकांनी, धारकांनी स्वत:हून मागणी केली नाही तरीही संबंधित राज्याची हेरिटेज कन्झर्वेशन कमिटी स्वत:हून सर्वेक्षण करून तशी शिफारस राज्य/ केंद्र सरकारला करू शकते. शासकीय अधिसूचनेनुसार घोषित झाल्याशिवाय कोणतीही ऐतिहासिक वास्तू, स्थळ, किंवा महापुरुषाच्या जीवनातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्वाच्या घटनांशी निगडित असलेला परिसर,कलाकृती, वस्तू इत्यादी वसा आणि वारसा (Heritage) समजता येत नाही. आंबेडकर भवन किंवा बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेस यासंदर्भात अशी शासकीय घोषणा न झाल्यामुळे लोकभावना काहीही असली तरी कायद्यानुसार या वास्तूला किंवा प्रेसला हेरिटेज म्हणता येणार नाही. सन १९४२ ते १९५२ या दहा वर्षांत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मुंबईशी संपर्क फार कमी राहिला होता. या कालावधीत बाबासाहेबांनी ट्रस्टच्या जागेला केवळ ३ ते ४ वेळा भेट दिल्याचे त्यांनी लघुवाद न्यायालयातील १९५४ सालचा दावा क्रमांक १०९५ /४९२० मध्ये वकिलांनी घेतलेल्या उलट तपासणीत सांगितले आहे. यावरून या जागेत कोणत्याही महत्वाच्या ऐतिहासिक घडामोडी घडलेल्या नाहीत, हे स्पष्ट होते. आंबेडकरं भवन किंवा बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेस सरकारने जरी हेरिटेज घोषित केले नसले तरी ही वास्तू व प्रेस हेरिटेज आहे किंवा ऐतिहासिक वारसा आहे असा दावा आता जे लोक करीत आहेत, त्यांनी बुद्ध भूषण प्रिंटिंग प्रेसमध्ये जे प्रिंटिंग मशीन होते त्या मशीनला लोकांना पाहण्यासाठी वर्षातून एखाद्या खास दिवशी (उदा.६ डिसेंबर) कधीही उपलब्ध करून दिले नाही. हे मशीन कोणत्या स्थितीत ठेवण्यात आले होते; याची सामान्य जनतेला काहीही माहिती कधीही देण्यात आली नाही. जर यास ऐतिहासिक वारसाचा दर्जा मिळावा



Scanned by CamScanner

अशी ही प्रेस ताब्यात असणाऱ्या व्यक्तींची/संस्थेची इच्छा असती तर त्यांनी कधीतरी याबाबत सरकारशी पत्रव्यवहार करण्याची मागणी केली असती. परंतु असे काही करण्यात आले नाही. यावरून केवळ लोकांना भावनात्मकरित्या उत्तेजित करण्यासाठी असा प्रचार केला जात आहे. या मशीनला ट्रस्टतर्फे काहीही नुकसान पोहचविण्यात आलेले नाही, हे पोलिसांनी केलेल्या पंचनाम्यात स्पष्टपणे नमूद केले आहे. तरीही हे मशीन हातोड्याने फोडण्यात आल्याचा खोटा प्रचार केला जातो आहे. हे अत्यंत चुकीचे आणि अनैतिक आहे.

**२)आंबेडकर भवन तोडणे म्हणजे आंबेडकरी चळवळीवरील हल्ला आहे काय ?**

आंबेडकर भवनमध्ये आंबेडकरी चळवळीशी अनेक कार्यक्रम, सभा इत्यादी आयोजित करण्यात येत होते,ही वस्तुस्थिती आहे. मात्र हे सर्व कार्यक्रम, सभा इत्यादी १९८५ नंतरच या ठिकाणी आयोजित करण्यात येऊ लागले. हे लक्षात घेणे आवश्यक आहे.आंबेडकर भवन हेच आंबेडकरी चळवळीचे एकमेव केंद्र होते असे म्हणणे ही अतिशयोक्ती होईल.आंबेडकरी चळवळ अत्यंत व्यापक आहे. ती राजकीय, सामाजिक, कलाविषयक, सांस्कृतिक, धार्मिक, साहित्यिक, कामगारविषयक अशा अनेक क्षेत्रांत जिवंत आहे. या सर्वांचे एकमेव केंद्र आंबेडकर भवनच होते किंवा आंबेडकरी चळवळीतील सर्वच संघटनांचे ते एकमेव मुख्यालय होते, असा दावा करणे गैर आहे. अलीकडील काळात एखाद्या विशिष्ट गटाच्या लोकांनाच ते कार्यक्रम अथवा इतर कोणत्या बैठकीसाठी उपलब्ध करून दिले जात असे. या ठराविक गटाच्या व्यतिरिक्त आंबेडकरी चळवळीतील इतर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक संघटनांच्या लोकांना तेथे मुक्तद्वार नसे. विरोध डावलून जर कार्यक्रम घेतलाच तर तो कार्यक्रम अथवा बैठक यशस्वी होऊ दिला जात नसे. अशा कार्यकर्त्यांना तेथून हुसकावून लावण्यात येत असे किंवा लाईट/वीज बंद केली जात असे. हा अनुभव अनेकांना आहे. मात्र यासंदर्भात उघडपणे कोणी तक्रार करायला धजावत नसत. आयु प्रकाश आंबेडकर यांनी सन २००६ मध्ये ट्रस्टच्या विरोधात, ट्रस्टने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत एक तक्रार अर्ज पोलिसांकडे केला होता. या तक्रार अर्जाचा चौकशी अहवाल भोईवाडा पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. दिनेश कुमार गुप्ता यांनी पोलीस उप आयुक्त परिमंडळ - ४ यांना दिनांक २४.०३.२००६ रोजी पाठविला होता. या चौकशी अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, मान. प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू असल्याचा फायदा घेऊन ट्रस्टची जागा पक्ष कार्यालयासाठी विनामोबदला वापरतात. ते इतरांशी मनमानीप्रमाणे वागतात. सन २००६ मध्ये भटक्या विमुक्तांचे बौद्ध धम्मात धर्मांतर करण्यासाठी धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीतर्फे एक भव्य कार्यक्रम मुंबईतील रेसकोर्स मैदानावर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजक दैनिक सम्राटचे संपादक बबन कांबळे व भटक्यांचे नेते लक्ष्मण माने यांच्या विनंतीवरून ट्रस्टने धम्मदीक्षा सुवर्ण महोत्सव समितीला तात्पुरते कार्यालय स्थापन करण्यासाठी ट्रस्टच्या इमारतीत जागा दिली. यावरून मान.आनंदराज प्रचंड संतापले. आदरणीय मीराताई आंबेडकर यांच्या भारतीय बौद्ध महासभा कार्यरत असताना दुसऱ्या नावाने धम्माचे काम करणाऱ्या संस्थेला तुम्ही बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या ट्रस्टच्या इमारतीत जागा कशी काय दिली म्हणून त्यांनी विश्वस्त मान.अनंत उपशाम, मान.वसंतराव धावरे, मान. प्रा. व्ही.एस आसवारे याना प्रचंड शिवीगाळ केली व हातपाय तोडण्याची धमकी दिली. याची लेखी तक्रार दिनांक ७-१०-२००६ रोजी भोईवाडा पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर आंबेडकर भवन येथे आंबेडकरी चळवळीतील इतर राजकीय पक्षाच्या गटांच्या लोकांना किंवा संघटनांना मुक्तपणे येऊ देण्यास आंबेडकर बंधू मज्जाव करीत होते हे दिसून येईल.या उदाहरणांवरून आंबेडकर भवन तोडणे म्हणजे आंबेडकरी चळवळीवरील हल्ला आहे हा लोकांना भावनिक करण्यासाठी केलेला अपप्रचार आहे असेच म्हणावे लागेल.

**३) आंबेडकर भवन रात्रीच्या वेळी गुपचूप रीतीने पाडणे योग्य आहे काय ?**

महानगरपालिकेने आंबेडकर भवन ही इमारत वापरास अयोग्य / धोकादायक म्हणून घोषित केली होती व त्यानुसार मुंबई महापालिका अधिनियमाच्या अनुच्छेद ३५४ नुसार एक महिन्याच्या आत ही इमारत निष्कासित करण्याची नोटीस दिनांक १ जून २०१६ रोजी ट्रस्टला दिली होती. ही नोटीस मिळाल्यानंतर त्यासंदर्भातील सूचना इमारतीच्या दर्शनी दरवाजावर चिकटविण्यात आली. या इमारतीत कार्यालय असलेले भारिप बहुजन महासंघ या पक्षाचे नेते मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर, रिपब्लिकन सेनेचे नेते मान. आनंदराज आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर,भारतीय बौद्ध महासभेचे नेते मान. भीमराव आंबेडकर यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर ही नोटीस चिकटविण्यात आली. या इमारतीचे पाडकाम



Scanned by CamScanner

करण्यासाठी पोलीस बंदोबस्त देण्याची विनंती दि.२१ जून २०१६ च्या पत्रान्वये भोईवाडा पोलीस ठाण्याला करण्यात आली. या पत्रात पाडकाम कोणत्या वेळी करण्यात येणार आहे त्याची माहिती देण्यात आली होती. त्यानंतर आंबेडकरी समाजात प्रामुख्याने वाचल्या जाणाऱ्या दैनिक सम्राट, दैनिक जनतेचा महानायक,दैनिक लोकनायक या वृत्तपत्रांत नियोजित इमारतीच्या संदर्भात लागोपाठ ३ दिवस जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. या सर्व काळात व पडामोडीच्या दरम्यान आंबेडकर भवनचे पाडकाम करण्यास मान.प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, मान. आनंदराज आंबेडकर, मान. भीमराव आंबेडकर यांपैकी कोणीही कोणताही आक्षेप घेतला नाही किंवा या कृतीला न्यायालयात आव्हान दिले नाही. या परिसरातील रहदारी आणि दिवसाच्या वेळेत होणारी वाहतूक कोंडी इत्यादी बाबी लक्षात घेऊन हे पाडकाम रात्रीच्या वेळी करण्यात आले. यात बेकायदेशीर काहीही नाही. केवळ लोकांना भडकविण्यासाठी मुद्दाम या बाबीला अतिशयोक्त रीतीने सांगण्यात येत आहे.

ज्यांना सत्य स्थिती दडवून परिस्थितीचा स्वत:च्या फायद्यासाठी वापर करायचा असतो त्यांना जनतेचा भावनात्मक उद्रेक घडवून आणणे आवश्यक असते. सध्याच्या व्हाट्सॲप, फेसबुकच्या जमान्यात गावखेड्यांपर्यंत पोहोचलेल्या सोशल मीडियाच्या आधारे आंबेडकर भवनच्या वादात असाच भावनात्मक उद्रेक निर्माण करण्यात आला आहे. जनता अधिक भावनाविवश व्हावी यासाठी वस्तुस्थितीचा आधार नसलेल्या अत्यंत खोट्या अफवा जनतेमध्ये पसरविण्यात येत आहेत. खेड्यापाड्यांत राहणाऱ्या जनतेला आंबेडकर भवन म्हणजे बाबासाहेबांचे घर असे वाटते.जनतेला सांगण्यात येत आहे की, सरकारनी व आंबेडकर घराण्याच्या विरोधकांनी बाबासाहेबांचे घर पाडल्यामुळे बाबासाहेबांचे कुटुंबीय बेघर झाले आहे, असा धादांत खोटा प्रचार खेड्यापाड्यात करण्यात आला. बाबासाहेबांचे घर पाडणारे तोतया ट्रस्टी व त्यांना तथाकथित साथ देणारे लोक आरएसएसचे दलाल आहेत,त्यांना सरकारने कोट्यवधी रुपये दिले आहेत, असा बेछूट आरोप लावण्यात आला आहे. बाबासाहेबांनी स्वत:च्या पैशातून विकत घेतलेली जागा बिल्डरला विकण्यात आली आहे, या ठिकाणी कमर्शिअल मॉल बांधण्यात येणार आहे. असा मॉल बनल्यानंतर आंबेडकरी-बौद्ध लोकांना येथे पाय ठेऊ देण्यात येणार नाही, अशा नानाविध अफवा पसरवून लोकांना आंदोलन करण्यासाठी भडकविण्यात आले. ज्यांना केवळ आणि केवळ असत्याचा आधारावर आपला स्वार्थ साधायचा आहे ते सत्य माहिती लोकांपर्यंत पोहोचू देत नाहीत. सत्यावर आधारित लढाई केली तर आपले पितळ उघडे पडेल अशी भीती अशा लोकांना असते. असे लोक मग भावनात्मक बाबींचा आसरा घेतात. जोरजोराने विलाप करून, मोठमोठ्याने रडून, आकांडतांडव करून आपल्यावर कसा अन्याय झाला आहे याचे प्रदर्शन मांडतात. सर्वात दु:खद गोष्ट म्हणजे विश्वातील महान सत्यनिष्ठ महापुरुषाचे सर्वोत्तम शिष्य,आयुष्यात ज्यांनी कधीही खोट्या गोष्टींचा आश्रय घेऊन स्वत:साठी किंवा आपल्या अनुयायांसाठी घेतला नाही, कायद्यावर, संविधानावर ज्यांची अपार श्रद्धा आणि विश्वास होता असे युगपुरुष, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाच वापर धडधडीत असत्य बाब स्थापित करण्यासाठी केला जातो; हे अत्यंत वेदनादायी आहे. असे सत्य लपवून, लोकांच्या भावना भडकावून स्वत:च्या शुल्लक स्वार्थासाठी बाबासाहेबांच्या विश्वसनीयतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करू पाहणाऱ्या आमच्या बांधवाना आम्ही सांगू इच्छितो की, भावांनो तुम्हाला जे हवे आहे ते घ्या, पिपल्स इम्प्रुव्हमेंट ट्रस्टची सर्व जागा ताब्यात घ्या, ती विका, त्या जमिनीचे जे काय करायचे आहे ते करा! मात्र बाबासाहेबांचे नाव घेऊन खोटे बोलू नका! तुम्ही आमच्या सर्वांचे मुक्तिदाते महापुरुष डॉ. बाबासाहेबांचे रक्त म्हणून आम्हाला आदरणीय आहात. परंतु बाबासाहेबांचे नाव असत्याचे समर्थन करण्यासाठी वापरू नका. बेकायदेशीर गोष्टींसाठी बाबासाहेबांना वेठीस धरू नका, ही आमची कळकळीची विनंती आहे.

**''जयभिम''**

Scanned by CamScanner

# प्रस्तावित आंबेडकर भवन, दादर, मुंबई

**दि पीपल्स इम्प्रव्हमेंट ट्रस्ट (स्थापना १९४४)**

संस्थापक : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर


डॉ.आंबेडकर भवन, गोकुळदास पास्ता लेन, दादर (पुर्व),मुंबई.४०००१४



एक यशस्वी पाऊल

## बाबासाहेबांच्या

स्वप्नपुर्तीकडे






वाचनालय



अद्ययावत सभागृह व रंगमंच



विपश्यना केंद्र



कम्युनिटी हॉल

**या भव्य उपक्रमास सढळ हस्ते मदत करुन बाबासाहेबांचे स्वप्न साकार करुया**

Scanned by CamScanner